सूर्यान एनर्जी प्रा. लि.
सोलर बसवा अन् ७८ हजार सबसिडी मिळवा!
लाईट बिल 'झिरो' करा.
आजच शासन योजनेचा लाभ घ्या
पत्ता : राहुरी स्टेशन रोड, १८ एकर समोर, राहुरी.
शाखा : श्रीरामपूर । पुणे । रायगड । कोल्हापूर
संपर्क : ९२०९१७६०३०, ९८९०३०६८९०



sarvmanthan16@gmail.com

दैनिक दिव्य सार्वमंथन

नवी दिशा, नवी आशा

मुख्य संपादक : अनिल कोळसे, मो. ९८२२५४४०७२

इंटरनेट आवृत्ती : गुगल वर पहा
www.sarvmanthan.in



श्रीयांश इंटरप्राईजेस
गिफ्ट गॅलरी, मोबाईल रिपेरिंग व ॲक्सेसरीज, ऑनलाईन सर्व्हिसेस
सर्व प्रकारचे इन्शुरन्स योग्य दरात करून मिळतील.
सीसी टी.व्ही. ■ इन्व्हर्टर बॅटरीची विक्री-दुरुस्ती व होम सर्व्हिस
सर्व प्रकारचे ऑनलाईन फॉर्म व शासकीय योजनेचे फॉर्म भरुन मिळतील.
पत्ता : सुभक्ती कॉम्प्लेक्स, कुलकर्णी हॉस्पिटलच्या मागे, शुक्लेश्वर रोड, राहुरी, जि. अहिल्यानगर
संपर्क : ८७९३०९५०५०



। अहिल्यानगर । महाराष्ट्र । । वर्ष १ ले । अंक ५८ वा । गुरुवार, ०९ जुलै २०२६ । पाने ४ । किंमत ३ रुपये । RNI No. MHMAR/26/A3154 । पोस्टल परवाना : SRP/146/2026-2028 ।




# विधानभवनाबाहेर शेतकऱ्यांचा उसळला संताप

## । क्रांतिकारी शेतकरी संघटना आक्रमक

### । कापूस-धान्य रस्त्यावर फेकले, विधानभवनात घुसण्याचा प्रयत्न, रविकांत तुपकरांसह कार्यकर्ते ताब्यात

**दिव्य सार्वमंथन**
**मुंबई । वृत्तसंस्था**

**राज्य सरकारने जाहीर केलेल्या दोन लाख रुपयांपर्यंतच्या शेतकरी कर्जमाफीविरोधात गुरुवारी विधानभवनाबाहेर क्रांतिकारी शेतकरी संघटनेने आक्रमक आंदोलन छेडले. कर्जमाफीतील जाचक अटी व निकष रद्द करण्याच्या मागणीसाठी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी विधानभवन परिसरात कापूस व धान्य रस्त्यावर फेकत जोरदार घोषणाबाजी केली. काही आंदोलनकर्त्यांनी मंत्रालयासमोरील झाडावर चढूनही सरकारचा निषेध व्यक्त केला. या प्रकारानंतर पोलिसांनी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांना ताब्यात घेत आझाद मैदान पोलीस ठाण्यात नेले.**

राज्य सरकारने नुकतीच दोन लाख रुपयांपर्यंतची पीककर्ज माफी जाहीर केली असली, तरी या निर्णयातून मोठ्या संख्येने शेतकरी वगळले जाणार असल्याचा आरोप क्रांतिकारी शेतकरी संघटनेने केला आहे. कर्जमाफीच्या निकषांमुळे केवळ मर्यादित शेतकऱ्यांनाच लाभ मिळणार असून, ही कर्जमाफी प्रत्यक्षात ''फसवी'' असल्याचा दावा संघटनेने केला.यावेळी बोलताना रविकांत तुपकर म्हणाले की, ''शेतकऱ्यांच्या घामाचा आणि हक्काचा जाब विचारण्यासाठी आम्ही विधानभवनात जाण्याचा प्रयत्न केला. मात्र सरकारने आमचे म्हणणे ऐकण्याऐवजी आम्हाला ताब्यात घेतले. आमचा गुन्हा एवढाच की आम्ही शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी आवाज उठवत आहोत.

तुपकर यांनी पुढे सांगितले की, कर्जमाफीतील जाचक अटी तातडीने रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना त्याचा लाभ देण्यात यावा. तसेच शेतकऱ्यांना हक्काचा पीकविमा मिळावा, अशीही मागणी त्यांनी केली. या मागण्यांबाबत मंत्री गिरीश महाजन यांनी बैठक घेण्याचे आश्वासन दिले होते. मात्र अद्याप कोणतीही बैठक न झाल्याने सरकारच्या भूमिकेविरोधात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला. विधानभवन परिसरातील या आंदोलनामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतल्याने परिस्थिती नियंत्रणात आली. दरम्यान, शेतकरी संघटनेने सरकारने मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.


राहुरीत खवय्यासाठी खुशखबर....
राजधन मटन खानावळ
ॲन्ड बिर्याणी हाऊस
स्पेशल कंदुरी मटण थाळी
। घरगुती जेवणाची उत्तम सोय ।
। व्हेज नॉनव्हेज पार्सल सुविधा ।
ठिकाण : नगर मनमाड रोडलगत, राजमाता जिजाऊ चौक, येवले चहाजवळ, मल्हारवाडी रोड, राहुरी, जि. अ.नगर
प्रोप्रा. श्री. चंदुभाऊ घोरपडे पाटील
मो नं ९८८१३३८७०९



राहुरी तालुक्यात दै. दिव्य सार्वमंथन वृत्तपत्रासाठी
पत्रकार नेमणे आहे
राहुरी शहर, राहुरी खुर्द, वळण, बारागाव नांदूर, राहुरी फॅक्टरी, उंबरे, ब्राह्मणी, वांबोरी, सोनई, शिंगणापूर, गुहा, म्हैसगाव, सोनगाव, कोल्हार खुर्द, ताहाराबाद
संपर्क : ९८२२५४४०७२, ९३७०९४८९११


# दुध व्यवसायातील बडे मासे रडारवर!

## । भेसळीवर एफडीए व एलसीबीची नजर? । काहींच्या प्लँटला टाळे?

**दिव्य सार्वमंथन**
**राहुरी । विशेष प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील दूध व्यवसायाशी संबंधित काही बड्या व्यक्तींची नुकतीच एक गोपनीय बैठक झाल्याची जोरदार चर्चा रंगली आहे. विशेष म्हणजे या बैठकीसोबतच मेजवानीचे आयोजन करण्यात आल्याने या भेटीमागील उद्देशावर संशय व्यक्त केला जात आहे.

या बैठकीला जिल्ह्यातील दूध व्यवसायातील अनेक मोठ्या माशांनी उपस्थिती लावल्याची माहिती समोर येत असून, पांढऱ्या दुधात काळे उद्योग करणाऱ्या एका प्रमुख व्यक्तीनेच या बैठकीचे नियोजन केल्याचे बोलले जात असून त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाकडे संशयाच्या नजरेतून पाहिले जात आहे.

राहुरी तालुक्यातील काही दूध व्यावसायिकांचाही या बैठकीत सहभाग असल्याची चर्चा असून, या बैठकीत नेमके काय ठरले याबाबत गुप्तता पाळली जात आहे. मात्र, दूध भेसळ आणि गैरव्यवहाराशी संबंधित काही मोठी नावे लवकरच पोलिसांच्या यादीत येणार असल्याची चर्चा सध्या जोर धरत आहे.

दरम्यान, मंचर पोलिसांनी ज्या पद्धतीने अहिल्यानगर जिल्ह्यात येऊन धडक कारवाई केली होती, त्याच पान २ वर

# महात्मा फुले कृषी विद्यापीठ प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांवर तोडगा

## स्वतंत्र समिती स्थापन करण्याचा निर्णय



**दिव्य सार्वमंथन**
**मुंबई । प्रतिनिधी**

राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या प्रकल्पग्रस्तांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विविध प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी मंत्रालयात मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली असून, प्रश्नांचा सर्वंकष अभ्यास करून योग्य तो मार्ग काढण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

या समितीत प्रकल्पग्रस्तांच्या प्रतिनिधींनाही स्थान देण्यात येणार असल्याने त्यांच्या समस्या आणि मागण्या थेट समितीसमोर मांडण्याची संधी उपलब्ध होणार आहे. तसेच, प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळावा, त्यांच्या प्रलंबित प्रश्नांचे लवकरात लवकर निराकरण व्हावे आणि शासन स्तरावर सकारात्मक निर्णय व्हावेत, यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

बैठकीस आमदार प्राजक्त तनपुरे, आमदार अक्षय कर्डीले, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे रजिस्ट्रार राजेंद्र पाटील, सुरसिंग पवार, मदत व पुनर्वसन विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच प्रकल्पग्रस्तांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीमुळे महात्मा फुले कृषीविद्यापीठप्रकल्पग्रस्तांच्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या प्रश्नांच्या निराकरणाबाबत आशादायी वातावरण निर्माण झाले असून, समितीच्या माध्यमातून लवकरच ठोस निर्णय होण्याची अपेक्षा प्रकल्पग्रस्तांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## फेसबुकवर राष्ट्रपुरुषांविषयी

# आक्षेपार्ह पोस्ट; आरोपीला अवघ्या १२ तासांत अटक

**दिव्य सार्वमंथन**
**पाथर्डी । प्रतिनिधी**

राष्ट्रपुरुषांविषयी आक्षेपार्ह मजकूर फेसबुकवर प्रसारित करून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला पाथर्डी पोलिसांनी अवघ्या १२ तासांत ताब्यात घेतले. या प्रकरणी सुरज बाबासाहेब वांढेकर (वय ३६) याला अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ८ जुलै २०२६ रोजी फेसबुकवरील एका अकाउंटवर राष्ट्रपुरुषांविषयी आक्षेपार्ह मजकूर असलेली पोस्ट व्हायरल झाली होती. ही बाब समोर येताच पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ८३६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ च्या कलम ३५३(२) अंतर्गत अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी, शेवगाव विभाग, सायबर पोलीस स्टेशन, अहिल्यानगर आणि पाथर्डी पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त पथकाने युद्धपातळीवर तपास सुरू केला. तांत्रिक तपासाद्वारे ही पोस्ट सुरज बाबासाहेब वांढेकर याने प्रसारित केल्याचे निष्पन्न झाले.

चौकशीदरम्यान आरोपीने देविदास शिरसाठ यांच्याशी वैयक्तिक वाद असल्याचे सांगितले. त्या वादातून देविदास शिरसाठ यांना त्रास व्हावा या हेतूने २६ जून २०२६ रोजी त्यांच्या फेसबुक खात्याचा प्रवेश (ॲक्सेस) मिळवून त्याच पान २ वर

# मोशी इमारत दुर्घटनेत ९ जणांची सुटका

**दिव्य सार्वमंथन**
**पुणे । वृत्तसेवा**

पिंपरी-चिंचवडमधील मोशी परिसरात इमारत कोसळल्याच्या दुर्घटनेनंतर बचावकार्य दुसऱ्या दिवशीही युद्धपातळीवर सुरू आहे. बचाव पथकांनी आतापर्यंत ९ जणांची सुखरूप सुटका करण्यात यश मिळवले असून, ढिगाऱ्याखाली आणखी ८ जण अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

ही दुर्घटना काल घडली असून, त्यानंतर तातडीने बचाव आणि शोधमोहीम सुरू करण्यात आली. घटनास्थळी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, अग्निशमन दल, लष्कराचे जवान, पोलीस प्रशासन आणि वैद्यकीय पथके सातत्याने कार्यरत असून, ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.दरम्यान, अडकलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली असून, आपल्या प्रियजनांची सुखरूप सुटका व्हावी या आशेने ते घटनास्थळीच थांबले आहेत. परिसरात भावनिक वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाकडून बचावकार्य अधिक वेगाने सुरू ठेवण्यात आले आहे.अद्याप ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांचा शोध सुरू आहे.

# सोनगावात जीर्ण झाडाची फांदी कोसळली

## लहान मुले थोडक्यात बचावली

**दिव्य सार्वमंथन**
**सोनगाव । प्रतिनिधी**



। सुदैवाने मोठी दुर्घटना टळली
। झाडाखाली लहान मुलांचा वावर.
। दोन दिवसांनंतरही फांदी रस्त्यावरच.
। जीर्ण झाडामुळे पालकांमध्ये चिंता.

राहुरी तालुक्यातील सोनगाव येथील घास गल्ली परिसरात सलग सुरू असलेल्या पावसामुळे सुमारे ५० ते ६० वर्षे जुना व जीर्ण झालेल्या झाडाची मोठी फांदी अचानक कोसळल्याची घटना घडली. सुदैवाने त्यावेळी झाडाखाली लहान मुले नसल्याने संभाव्य मोठी दुर्घटना टळली. मात्र, या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, या झाडाच्या सावलीत परिसरातील लहान मुले नेहमी खेळत असतात. पावसामुळे परिसरात चिखल झाल्याने त्या दिवशी मुले ग्रामपंचायत कार्यालयासमोरील मैदानात खेळत होती. त्याचवेळी झाडाची मोठी फांदी कडाडून रस्त्यावर कोसळली. फांदी पडत असताना रस्त्यावर महिला, विद्यार्थी किंवा अन्य नागरिक नसल्याने जीवितहानी टळली.

घटना घडून दोन दिवस उलटूनही संबंधित प्रशासनाने पडलेली फांदी हटविलेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून अपघाताचा धोका कायम आहे.

विशेष म्हणजे, या झाडासमोरच सोनगावची अंगणवाडी असून तिची पत्रा कंपाऊंड शेड झाडालगत आहेत. त्यामुळे अंगणवाडीत येणाऱ्या चिमुकल्यांच्या सुरक्षेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

### अरवाळी

झाला कसा पराजय
सभेमधे रणधुमाळी
चिंतन शिबीर भरले
चिंतनीय अंतर्माळी

मुलासमान भांडतात
सगळी वरिष्ठमंडळी
घेरावे संपूर्ण एखाद्या
करून बसे कोंडळी

उडवे शिव्यांची राळी
जमली सारी गोंधळी
भांडतोयं आप्तांशीचं
विसरुन गेली वेंधळी

मोडतोड सामानाची
माते जोशा लाथाळी
जेवी तिथं घाण करी
दुषीत करतात थाळी

वैगुण्य दावावे दुजांचे
काढे उखळी पाखळी
दोष टाकून दुजावरती
वरिष्ठ मंडळी मोकळी

घरटे आहे आपलेचं
जरा तारतम्य पाळी
गरमागरम तव्यावर
भाजे आपली पोळी

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

# राहुरीत निवृत्तीनाथांच्या पालखीने भक्तीचा महासागर

## वारकऱ्यांसाठी व्यवस्था; मार्तंड देवस्थान ट्रस्ट व शहरवासियांचा पुढाकार; 'सेवा हीच पंढरीची वाट'चा प्रत्यय

**दिव्य सार्वमंथन**
**राहुरी । प्रतिनिधी**

त्रिंबकेश्वर येथून निघालेल्या आणि राज्यातील सर्वात मोठी दिंडी म्हणून ओळख असलेल्या संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखी सोहळ्याने राहुरी नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली. हजारो-लाखो वारकऱ्यांच्या स्वागतासाठी राहुरीतील श्री मार्तंड देवस्थान ट्रस्ट व समस्त ग्रामस्थांनी भव्य शामियाना मंडप उभारून तसेच भोजनाची उत्कृष्ट व्यवस्था करून 'अतिथी देवो भव' या संस्कृतीचा जिवंत प्रत्यय घडवला.

देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष चाचा तनपुरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, वारकऱ्यांच्या निवास, विश्रांती व भोजनाची काटेकोर तयारी करण्यात आली असून कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये यासाठी ग्रामस्थ, स्वयंसेवक आणि शहरातील नागरिकांनी एकत्र येत सेवा बजावली.





सौ. भागीरथीबाई तनपुरे शाळा परिसरात वारकऱ्यांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली असून स्वच्छता, पाणी व शिस्त याकडे विशेष लक्ष देण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही संत निवृत्तीनाथांची पालखी राहुरीत दाखल होताच 'ज्ञानोबा-तुकोबा'च्या गजरात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. वारकरी संप्रदायातील भक्ती, शिस्त आणि समतेचा संदेश देणारा हा सोहळा भाविकांसाठी आध्यात्मिक उर्जेचा स्रोत ठरला.

यासोबतच राहुरी नगर परिषदेकडूनही आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्रशासन आणि ग्रामस्थांच्या समन्वयातून पार पडलेल्या या सेवाकार्यातून वारकरी संप्रदायातील 'सेवा, समर्पण आणि साधेपणा' या मूल्यांची प्रचिती पुन्हा एकदा आली.

राहुरीत झालेल्या या स्वागत सोहळ्यामुळे भक्ती, सेवा आणि सामाजिक एकात्मतेचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.



# संपादकीय...

मो. ९८२२५४४०७२

## आघाडीत अस्वस्थता की राजकीय डावपेच?

महाराष्ट्राच्या राजकारणात योगायोगांवर फार कमी जण विश्वास ठेवतात. विशेषतः ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या बाबतीत तर प्रत्येक भेट, प्रत्येक शब्द आणि प्रत्येक शांतताही राजकीय संदेश देत असल्याचे मानले जाते. त्यामुळे जवळपास तीन दशकांनंतर शरद पवार यांनी विधानभवनात जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घेतलेली भेट ही केवळ शिष्टाचाराची होती, असे सहजपणे मानणे कठीण आहे. उलट या भेटीने राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना तोंड फुटले असून महाविकास आघाडीच्या भवितव्याबाबत अनेक प्रश्न उभे राहिले आहेत.या भेटीनंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी, ''या भेटीमुळे आमचे मन दुखावले,'' अशी प्रतिक्रिया देत महाविकास आघाडीतील अस्वस्थतेला जणू शब्दच दिले. राऊत यांच्या या विधानाकडे केवळ भावनिक प्रतिक्रिया म्हणून पाहून चालणार नाही. कारण महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्ये विश्वास हा सर्वात मोठा आधार आहे. तोच जर डळमळीत झाला, तर विरोधकांची एकजूट किती दिवस टिकणार, हा प्रश्न निर्माण होणे साहजिक आहे.राज्यात आधीच 'ऑपरेशन टायगर'च्या नावाखाली मोठ्या राजकीय हालचाली सुरू असल्याची चर्चा आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटातील सहा खासदार आणि एका आमदाराने शिंदे गटात प्रवेश केल्याने विरोधी पक्षांच्या छावणीत खळबळ उडाली आहे. ही धूळ अजून खाली बसलेली नसतानाच शरद पवारांची सत्ताधाऱ्यांसोबतची भेट झाली आणि संशयाच्या ठिणगीने पुन्हा एकदा राजकीय वातावरण पेटले.प्रश्न असा आहे की, ही भेट नेमकी कशासाठी होती? राज्यातील विकासकामांवर चर्चा करण्यासाठी? एखाद्या प्रशासकीय विषयासाठी? की महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा नवीन समीकरणांची बीजे रोवण्यासाठी? अधिकृतपणे काहीही सांगितले जात असले तरी राजकारणात अनेक वेळा जे दिसते, त्यामागे वेगळेच गणित असते.शरद पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील अत्यंत अनुभवी खेळाडू मानले जातात. सत्तेची समीकरणे बदलण्याची, विरोधकांशी संवाद ठेवण्याची आणि योग्य वेळी योग्य राजकीय चाल खेळण्याची त्यांची शैली नवीन नाही. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक हालचालीचा अर्थ लावण्याचा प्रयत्न राजकीय विश्लेषक करतात. मात्र या वेळी प्रश्न फक्त पवारांच्या राजकीय शैलीचा नाही; तर महाविकास आघाडीतील परस्पर विश्वासाचाही आहे.गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) राष्ट्रीय लोकशाही आघाडीत (एनडीए) सहभागी होऊ शकते, अशा चर्चा माध्यमांमध्ये सुरू आहेत. या चर्चांना अधिकृत दुजोरा नाही, हे खरे; पण अशा चर्चांना पूर्णविराम देण्याऐवजी या भेटीमुळे त्या अधिकच बळावल्या. राजकारणात अनेकदा मौनही संदेश देत असते. त्यामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याची जबाबदारी संबंधित पक्षांवरच आहे.महाविकास आघाडीची स्थापना ही भाजपविरोधी राजकारणाच्या समान धाग्यावर झाली होती. महाराष्ट्राच्या राजकारणाने गेल्या काही वर्षांत अनेक अनपेक्षित वळणे पाहिली आहेत. पहाटेचा शपथविधी, पक्षफुटी, आमदारांचे बंड, खासदारांचे स्थलांतर, चिन्हांवरील लढाया, न्यायालयीन संघर्ष आणि सतत बदलणारी सत्तासमीकरणे या सर्व घटनांनंतर आता कोणतीही राजकीय शक्यता अशक्य वाटत नाही. त्यामुळे पवारांच्या या भेटीकडेही सामान्य जनता आणि राजकीय निरीक्षक संशयाच्या नजरेने पाहत आहेत. राजकारणातील सर्वात मोठे भांडवल हे जनतेचा विश्वास असतो; सत्ता नव्हे.आज महाराष्ट्रातील शेतकरी संकटात आहे, बेरोजगारी वाढत आहे, उद्योग गुंतवणुकीवर प्रश्न उपस्थित होत आहेत, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत, महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. अशा वेळी जनतेला सत्तेच्या कॉरिडॉरमध्ये कोण कोणाला भेटले यापेक्षा त्या भेटीतून जनतेच्या प्रश्नांवर काय निर्णय झाला, हे अधिक महत्त्वाचे वाटते. दुर्दैवाने अशा भेटींनंतर राजकीय संदेश जास्त मिळतात आणि लोकहिताचे निर्णय कमी दिसतात.आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्था, विधान परिषद आणि पुढील विधानसभा निवडणुका या सर्वांचा विचार करता महाराष्ट्रात पुन्हा मोठी राजकीय पुनर्रचना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रत्येक पक्ष आपले अस्तित्व मजबूत करण्यासाठी नवीन पर्याय शोधत आहे. त्यामुळे आजची एक भेट उद्याच्या नव्या राजकीय समीकरणाची सुरुवात ठरेल का, हा प्रश्न अनुत्तरित आहे.शरद पवार यांच्या राजकीय कारकिर्दीने अनेक वेळा सिद्ध केले आहे की, ते शेवटचे पान उघडे होईपर्यंत आपले राजकीय डावपेच स्पष्ट करत नाहीत. त्यामुळे त्यांच्या या भेटीमागे केवळ औपचारिकता आहे की दूरगामी राजकीय रणनीती, हे काळच ठरवेल.परंतु एक गोष्ट निश्चित आहे.

## श्री संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यात
# वारकऱ्यांना आरोग्य सेवेचा दिलासा

**दिव्य सार्वमंथन**
**सोनगाव | प्रतिनिधी**

आषाढी वारीतील वारकऱ्यांचा पायी प्रवास सुखकर, सुरक्षित आणि आरोग्यदायी व्हावा, या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेनुसार मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्षामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'चरणसेवा' उपक्रमांतर्गत प्रवरा मेडिकल कॉलेज, लोणीच्या वतीने राजुरी (ता. राहाता, जि. अहिल्यानगर) येथे चरणसेवा व मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

दि. ७ जुलै रोजी श्री संत निवृत्तीनाथ महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे राजुरी येथे आगमन झाले. यावेळी शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास केलेल्या वारकऱ्यांच्या थकलेल्या पावलांना दिलासा देण्यासाठी आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला.



वारकऱ्यांच्या मुक्कामस्थळी आयुर्वेदिक औषधी तेलाच्या साहाय्याने चरणसेवा करण्यात आली. पायांना औषधी तेलाने मसाज केल्यामुळे दीर्घ पायी प्रवासामुळे आलेला ताण आणि थकवा कमी होण्यास मदत झाली तसेच पुढील प्रवासासाठी वारकऱ्यांना नवउत्साह मिळाला.

चरणसेवेसोबतच वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. आवश्यक औषधांचे मोफत वाटप, प्रथमोपचार सेवा तसेच विविध आरोग्यविषयक विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमात प्रवरा मेडिकल कॉलेजचे डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, वैद्यकीय विद्यार्थी आणि स्वयंसेवक यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. सर्व वारकऱ्यांना आपुलकीने, तत्परतेने आणि समर्पित भावनेने चरणसेवा व आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात आली.

चरणसेवा या सेवाभावी उपक्रमामुळे पुढील प्रवासाला मोठा आधार मिळाल्याची भावना वारकऱ्यांनी व्यक्त केली. याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्ष तसेच प्रवरा मेडिकल कॉलेजचे डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, वैद्यकीय विद्यार्थी, स्वयंसेवक आणि सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रवरा मेडिकल कॉलेजचे अधिकारी, कर्मचारी आणि स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले.



# पालखी दिंडीचा पहिला रिंगण सोहळा

**दिव्य सार्वमंथन**
**नेवासा | प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वर महाराजांची कर्मभूमी व ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे रचनास्थान असलेल्या तीर्थक्षेत्र नेवासा येथून ग्रंथराज ज्ञानेश्वरी पालखी दिंडीचे बुधवारी पंढरपूरकडे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे प्रमुख महंत वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री, गंगापूरचे गाथामूर्ती हभप रामभाऊ महाराज राऊत तसेच हभप राम महाराज झिंजुरके यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या पालखी सोहळ्यात सुमारे ३० दिंड्यांसह हजारो वारकरी सहभागी झाले. नेवासा एसटी आगार परिसरात सोहळ्यातील पहिला रिंगण उत्साहात पार पडला.

यावेळी हभप भगवान महाराज जंगले शास्त्री, नंदकिशोर महाराज खरात, कृष्णा महाराज हारदे, ज्ञानेश्वर माऊली शिंदे, ज्ञानेश्वर महाराज हजारे, लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, रामनाथ महाराज वाकचौरे यांच्यासह वारकरी संप्रदायातील महाराज, नेवासकर नागरिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जायकवाडी प्रकल्पातील पुनर्वसित गावांचे सर्व्हेक्षण करा : ना. विखे

**दिव्य सार्वमंथन**
**अ.नगर | प्रतिनिधी**

जायकवाडी प्रकल्पातील पुनर्वसित गावांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी महसूल आणि जलसंपदा विभागाने एकत्रित सर्व्हेक्षण करून एक महीन्यात प्रस्ताव सादर करण्याचा सूचना जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

जायकवाडी प्रकल्पात पुर्नवसित झालेल्या शेवगाव नेवासा आणि गंगापूर तालुक्यातील गावांच्या समस्याबद्दल मंत्रालयात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.बैठकीला मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील,आ.मोनिका राजळे आ.रमेश बोरनारे आ.विठ्ठलराव लंघे आ.अक्षय कर्डीले जलसंपदा



विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांच्यासह जलसंपदा आणि मदत व पुनर्वसन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत पुर्नवसित गावात बुडीत क्षेत्र किती आहे.असलेल्या किती जमीनीमध्ये पाणी जाते याबाबतचा ड्रोण सर्व्हे करून घेण्याचे सूचित करून,जलसंपदा व महसूल विभागाने गावांमध्ये जनसुनावणी घेवून ज्यांच्या जमीनी आहेत त्या शेतकऱ्यांची माहीती महीना भरात संकलित करून त्याचा प्रस्ताव शासनाने पाठवावा.

जमीन अदलाबदल, भोगावटा वर्ग एक करणे,तसेच पुर्नवसित गावात नसलेल्या सुविधांचा आढावा जिल्हाधिकारी यांनी घ्यावा यासंदर्भात स्वतंत्र बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आले.मदत व पुर्नवसन मंत्री मकरंद पाटील यांनी जमीनीचा सर्व्हे आल्यानंतर त्या गावातील प्रश्नाच्या संदर्भात निर्णय करण्याची ग्वाही दिली.

शेतकऱ्यांच्या समस्या मांडतांना आ.मोनिका राजळे यांनी जायकवाडी प्रकल्प आधी झाला.त्यानंतर झालेल्या कायद्यामुळे शेतकऱ्यांची मोठी समस्या निर्माण झाल्याचे सांगितले.आ.विठ्ठलराव लंघे यांनी पुर्नवसित गावांच्या समस्या मोठ्या प्रमाणात आहेत.

# मुळा धरणात पडलेला ४० एचपी मोटर पंप अखेर बाहेर

## देवळाली नगरपरिषदेची यशस्वी तांत्रिक मोहीम

**दिव्य सार्वमंथन**
**दे. प्रवरा | प्रतिनिधी**

देवळाली प्रवरा नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा योजनेतील मुळा धरणात सुमारे पाच महिन्यांपूर्वी चेन ब्लॉक तुटल्याने पडलेला ४० एचपी क्षमतेचा मोटर पंप व त्यास जोडलेले पाच जी.आय. पाईप अखेर विशेष तांत्रिक मोहिमेद्वारे सुरक्षितपणे बाहेर काढण्यात नगरपरिषदेला यश आले आहे.

पाणी उपसा यंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामादरम्यान हा मोटर पंप धरणात पडला होता. त्यावेळी धरणातील पाण्याची पातळी अधिक असल्याने पंप बाहेर काढणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नव्हते. त्यामुळे उन्हाळ्यात पाण्याची पातळी कमी झाल्यानंतर नियोजनबद्ध पद्धतीने ही मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

दरम्यान, हवामान विभागाच्या अंदाजानुसार मान्सून उशिरा सुरू होण्याची व पर्जन्यमान कमी राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. त्यामुळे पाण्याची पातळी आणखी खाली जाईल आणि मोटर पंप बाहेर काढणे सोयीचे होईल, असा तांत्रिक अंदाज नगरपरिषदेने व्यक्त केला होता. मात्र, गेल्या पाच ते सहा दिवसांपासून धरणाच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्याने धरणातील पाण्याची आवक वेगाने वाढू लागली. त्यामुळे पाण्याची पातळी वाढण्यापूर्वीच मोटर पंप बाहेर काढण्याचा निर्णय घेण्यात आला.

नगराध्यक्ष सत्यजित कदम यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी नगरपरिषदेने विशेष तांत्रिक मोहीम राबविली. धरणातील खोल पाणी, चिखलयुक्त तळ, मोटर पंपाचे मोठे वजन आणि प्रतिकूल परिस्थितीमुळे हे काम अत्यंत आव्हानात्मक ठरले. पाणीपुरवठा विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी क्रेन, स्टील वायर रोप, विशेष रस्से आणि आवश्यक यंत्रसामग्रीच्या साहाय्याने अनेक तास अथक प्रयत्न करून मोटर पंप व त्यास जोडलेले जी.आय. पाईप सुरक्षितपणे धरणाबाहेर काढले.

दरम्यान, मोटर पंप धरणात पडल्यापासून शहराच्या पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यावर कोणताही परिणाम होऊ नये, यासाठी नगरपरिषदेने पर्यायी मोटर पंप कार्यान्वित ठेवून अखंड पाणीपुरवठा सुरू ठेवला. त्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईचा कोणताही त्रास सहन करावा लागला नाही.



नगराध्यक्ष सत्यजित कदम म्हणाले, ''शहरातील पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यावर कोणताही परिणाम होऊ नये, ही आमची सर्वोच्च प्राथमिकता होती. त्यामुळे पर्यायी मोटर पंपाद्वारे अखंड पाणीपुरवठा सुरू ठेवण्यात आला. धरणातून बाहेर काढलेल्या मोटर पंपाची तातडीने तांत्रिक तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करण्यात येईल. त्यानंतर हा मोटर पंप राखीव स्वरूपात ठेवण्यात येणार असून भविष्यात कोणताही तांत्रिक बिघाड झाल्यास पाणीपुरवठा यंत्रणेवर त्याचा परिणाम होणार नाही.''

या मोहिमेदरम्यान नगराध्यक्ष सत्यजित कदम, नगरसेवक तथा भाजप गटनेते प्रकाश संसारे आणि नगरसेवक सचिन शेटे यांनी घटनास्थळी भेट देऊन कामाची पाहणी केली तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.


## राहुरीत पाहिजेत

**जयहिंद अल्फा सप्लायर्स**

मार्केट यार्ड राहुरी कॉम्प्युटर ज्ञान असलेला व हिशोब करण्याची माहिती असलेला तरुण पाहिजे. योग्य पगार दिला जाईल.

संपर्क – ७२१९८७३६४१ ७३८७९७७७७७

(३० मे

## मुळव्याध, मुतखडा व भगंदर त्वचारोग आयुर्वेदिक औषधाने बरा

मुळव्याध रक्त पडणे, कोंब, आग होणे, भगंदर, शौचास त्रास तसेच मुतखडाचे सर्व आजारावर–आयुर्वेदिक औषध मुतखडा (किडनी स्टोन) १ एमएम ते ४० एमएमचे–खडे औषधाने विरघळतात. पोट, कंबर, गुडघे दुखणे यावर आयुर्वेदिक रामबाण

औषध ऑपरेशनची गरज नाही, त्वचा रोग संबंधी सर्व औषध उपलब्ध आयुर्वेदिक बरे झालेले पेशंटचे व्हिडिओ पहायला मिळेल.

संपर्क–अशोकराव पालवे वांजुळपोई, ता. राहुरी मो. नं. ९३७०५०४७७६

(०३ डिसेंबर)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 6.7.26
कल्याण – राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन बाजार

Date : 6.7.26

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 4 149 167 257 | 9 360 450 469 | 1 146 236 678 | 6 178 169 349 |
| दिनांक ७.७.२६ | 5 168 267 258 | 0 127 136 235 | 2 570 589 679 | 7 278 458 890 |
| दिनांक ८.७.२६ | 6 123 169 367 | 1 128 245 489 | 3 580 670 689 | 8 350 369 459 |
| दिनांक ९.७.२६ | 7 124 278 250 | 2 237 345 570 | 4 167 158 149 | 9 234 270 469 |
| दिनांक १०.७.२६ | 8 125 134 350 | 3 148 346 490 | 5 230 690 780 | 0 235 370 578 |
| दिनांक ११.७.२६ | 9 126 234 270 | 4 257 590 789 | 6 367 349 790 | 1 128 236 678 |

कायमचा मेंबरसाठी संपर्क साधा (अंकशास्त्रावर आधारित दुर उपयोग करु नये)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 6.7.26
कल्याण राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन मुंबई

100% Date Fix FREE GAME Open to Close

| सोमवार ते मंगळवार | बुधवार ते गुरुवार |
|---|---|
| 4 338 699 9 388 144 | 5 366 447 0 118 299 |
| 40 - 45 x 90 - 95 | 51- 56 X 01- 06 |

| शुक्रवार ते शनिवार | साप्ताहिक |
|---|---|
| 1 227 588 6 277 330 | 2 336 499 7 188 449 |
| 12 - 17 x 62 - 67 | 23 - 28 X 73 - 78 |

साप्ताहिक CP 10 X 45 67 X 34 12 X 23

विचार बदला नशीब बदलेल
संपर्क : 9970640587


# बेलापूरात निवृत्तीनाथांच्या पालखीचे आगमन

**दिव्य सार्वमंथन**
**बेलापूर | प्रतिनिधी**

संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखी सोहळ्यातील दिंडीचे बुधवारी बेलापूर येथे भक्तिमय वातावरणात आगमन झाले. दिंडीच्या स्वागतासाठी गावातील नागरिक, वारकरी, महिला व युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावत ज्ञानोबा–तुकारामच्या जयघोषात दिंडीचे जल्लोषात स्वागत केले.

दिंडीतील टाळ–मृदुंगाच्या गजरात, हरिनामाच्या अखंड घोषात आणि अभंग–भजनांच्या सुरावटींनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. वारकऱ्यांच्या शिस्तबद्ध चालण्याने आणि भक्तिभावाने उपस्थित भाविकांचे लक्ष वेधून घेतले. दिंडीच्या आगमनानिमित्त विविध ठिकाणी वारकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची, अल्पोपहाराची तसेच इतर



आवश्यक सुविधांची व्यवस्था करण्यात आली होती. ग्रामस्थांनी वारकऱ्यांचे मनापासून स्वागत करत सेवा करण्याचा आनंद लुटला.

संत निवृत्तीनाथ महाराजांच्या दिंडीच्या आगमनामुळे बेलापूरमध्ये दिवसभर भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, वारकरी संप्रदायाच्या परंपरेचे दर्शन घडले.

पान १ वरून पान १ वरून

## आक्षेपार्ह पोस्ट; आरोपीला अवघ्या १२ तासांत अटक

खात्यावरून राष्ट्रपुरुषांची बदनामी करणारा संदेश व्हायरल केल्याची कबुली आरोपीने दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली असून पुढील तपास पाथर्डी पोलीस स्टेशन करीत आहे. दरम्यान, या घटनेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी शांतता राखावी, कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी आणि पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

## दूधव्यवसायातील 'मोठे मासे' एका टेबलावर

धर्तीवर आता एलसीबीच्या पथकाने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुक्काम तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन संबंधितांवर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे या कथित काळ्या व्यवसायाला काही राजकीय आशीर्वाद असल्याचीही चर्चा रंगत असल्याने प्रकरण अधिकच गंभीर बनले आहे. त्यामुळे या पांढऱ्या धंद्यातील काळे सत्य लवकरच समोर येणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात

### मच्छिंद्र पवार पाटील यांची स्वस्त धान्य व रॉकेल दुकानदार संघटनेच्या अध्यक्षपदी नियुक्ती



दिव्य सार्वमंथन ✍ नेवासा । अहिल्यानगर जिल्हा स्वस्त धान्य व रॉकेल परवानाधारक असोसिएशनच्या जिल्हा मेळाव्यात संघटनेतील सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत मच्छिंद्र पवार पाटील यांची नेवासा तालुका स्वस्त धान्य व रॉकेल दुकानदार संघटनेच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. संघटनेचे जिल्हाध्यक्ष सतीश हिरडे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत विभागीय अध्यक्षा मीनाताई कळकुंबे यांनी पवार पाटील यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. राज्य फेडरेशन व जिल्हा असोसिएशनची ध्येय-धोरणे तळागाळापर्यंत पोहोचविणे, संघटना बळकट करणे आणि सभासद वाढीसाठी काम करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष सतीश हिरडे पाटील यांनी दुकानदारांच्या प्रश्नांसाठी काम करण्याचे आवाहन केले. या निवडीबद्दल जिल्हासचिव सोमनाथ देवकर, जिल्हाउपाध्यक्ष बावा शेख तसेच बाळासाहेब थोरात, प्रकाश जाधव,पंकज आरसुळे, अंबादास भवार, जगन्नाथ पेहेरे, दत्तात्रय काकडे, महादेव दराडे, अण्णासाहेब दरंदले, भारत गवळी, येडू ढगे, ईश्वर मते, साईनाथ धुमाळ, ज्ञानेश्वर पवार, रमेश लोखंडे, सचिन कडू, शिवाजी काकडे, देविदास मुखेकर, रेवन कांगुणे यांच्यासह तालुक्यातील दुकानदारांनी त्यांचे अभिनंदन केले.

### निराधारांसाठी आता शिवसेना हेल्पलाइन कक्ष करणार जोमाने काम




दिव्य सार्वमंथन ✍ राहाता । समाजातील निराधार, गरजू, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, विधवा महिला तसेच शासकीय योजनांपासून वंचित राहिलेल्या नागरिकांना तातडीची मदत आणि योग्य मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने शिवसेनेच्या वतीने शिवसेना हेल्पलाइन कक्षाची स्थापना करण्यात आली. उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते श्री एकनाथ शिंदेयांच्या उपस्थितीत या उपक्रमाची घोषणा करण्यात आली. या हेल्पलाइन कक्षामार्फत निराधार नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती, अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शन, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, आरोग्यविषयक मदत, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांच्या योजनांसंदर्भातील सहाय्य, तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, अनेक गरजू नागरिकांना योग्य माहिती व मार्गदर्शनाच्या अभावामुळे शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही. ही बाब लक्षात घेऊन हेल्पलाइन कक्षाच्या माध्यमातून नागरिकांना एकाच ठिकाणी आवश्यक मदत उपलब्ध करून देण्याचा संकल्प करण्यात आला आहे. हेल्पलाइन कक्षामार्फत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक तक्रारीची नोंद घेऊन संबंधित शासकीय विभागांशी समन्वय साधत तातडीने पाठपुरावा केला जाणार असून, गरजू नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने काम केले जाईल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. या उपक्रमामुळे निराधार, दिव्यांग, विधवा महिला, ज्येष्ठ नागरिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठा दिलासा मिळणार असून, समाजहिताच्या विविध उपक्रमांना अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### सुभाष लव्हाटे यांचे निधन

दिव्य सार्वमंथन ✍ नेवासा । तालुक्यातील खरवंडी येथील



प्रगतशील शेतकरी सुभाष किसन लव्हाटे (वय ५९) यांचे सोमवारी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने खरवंडी व नेवासा परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, दोन भाऊ आणि दोन बहिणी असा मोठा परिवार आहे. नेवासा येथील राजे शिवकालीन मर्दानी खेळ प्रशिक्षण संस्थेचे संस्थापक मास्टर सुरेश लव्हाटे व प्रसिद्ध व्यावसायिक बाबासाहेब लव्हाटे यांचे ते बंधू होत.

## जि.प. मराठी शाळा सोनई नं. १ ला मूलभूत सुविधांची प्रतीक्षा

# ‘कुणी गेट देता का गेट?’ असा संतप्त सवाल

**दिव्य सार्वमंथन**
**सोनई । प्रतिनिधी**



नेवासा तालुक्यातील जिल्हा परिषद मराठी शाळा सोनई क्रमांक १ ही शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांची वाढती संख्या आणि डिजिटल सुविधांमुळे परिसरात आदर्श शाळा म्हणून ओळखली जात असली, तरी मूलभूत सुविधांच्या अभावामुळे शाळेला अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विशेषत: शाळेला संरक्षणात्मक गेट नसल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून, ‘‘या शाळेला कुणी गेट देता का गेट?‘‘ असा संतप्त सवाल ग्रामस्थ आणि पालकांकडून उपस्थित केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शाळेच्या प्रवेशद्वाराला गेट बसविण्याची मागणी अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे. मात्र प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. विद्यार्थ्यांची संख्या वाढत असताना शाळा परिसर सुरक्षित ठेवण्यासाठी गेटची अत्यंत आवश्यकता असल्याचे पालकांचे मत आहे.

याशिवाय शाळेत मुलींसाठी केवळ एकच स्वच्छतागृह उपलब्ध असून मुलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना बाहेरील जागेचा वापर करावा लागत असल्याने गैरसोय निर्माण होत आहे. स्वच्छता आणि आरोग्याच्या दृष्टीने हा गंभीर प्रश्न असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.शाळेची जुनी इमारत धोकादायक अवस्थेत असून ती पाडण्यासाठी आवश्यक असलेली निरलेखन प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. परिणामी शाळा परिसरातील सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तसेच शाळेच्या जागेवर काही व्यावसायिकांनी अतिक्रमण करून पक्की दुकाने व बांधकामे उभारल्याचा आरोप करण्यात आला आहे. या अतिक्रमणांचे मोजमाप करून कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.गोरगरीब कुटुंबातील अनेक विद्यार्थी या शाळेत शिक्षण

> ‘‘शाळेचा शैक्षणिक दर्जा उत्कृष्ट असून शासनाने या प्रश्नांची तातडीने दखल घेऊन आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.’’
>
> संजय वैरागर
> (सामाजिक कार्यकर्ते)

घेत असून शाळेचा शैक्षणिक दर्जा उल्लेखनीय असल्याचे नागरिक सांगतात. मात्र सुविधांच्या अभावामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. ठेकेदार आणि प्रशासन यांच्यातील प्रक्रियात्मक अडचणींमुळे विविध विकासकामे रखडल्याचीही चर्चा परिसरात सुरू आहे.दरम्यान, शिक्षण विभागाने या प्रश्नांकडे तातडीने लक्ष देऊन गेट, स्वच्छतागृह, अतिक्रमण निर्मूलन आणि इमारतीच्या प्रश्नांवर ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा ग्रामस्थ व विविध सामाजिक संघटनांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## आयुब शेख कुटुंबीय हज यात्रेस रवाना

**दिव्य सार्वमंथन**
**देवळाली प्रवरा । प्रतिनिधी**



इस्लाम धर्मातील अत्यंत पवित्र आणि महत्त्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या हज यात्रेसाठी देवळाली येथील सेवानिवृत्त तलाठी आयुब शेख हे सुपुत्र आशिफ शेख व कुटुंबियांसमवेत रवाना झाले. त्यांच्या या पवित्र यात्रेनिमित्त देवळाली येथील डीएमसी उद्योग समूहाच्या वतीने सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा देत यात्रा सुखरूप, मंगलमय आणि यशस्वीरीत्या पूर्ण होण्यासाठी प्रार्थना केली. डीएमसी उद्योग समूहाचे अध्यक्ष तथा नगरसेवक अजित चव्हाण यांच्या हस्ते आयुब शेख यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना अजित चव्हाण यांनी हज यात्रा ही श्रद्धा, संयम, त्याग आणि मानवतेचा संदेश देणारी पवित्र यात्रा असल्याचे सांगितले. आयुब शेख व त्यांच्या कुटुंबीयांची ही यात्रा सुखरूप पार पडावी तसेच त्यांना उत्तम आरोग्य, आनंद आणि आध्यात्मिक समाधान लाभावे, अशा शुभेच्छा त्यांनी व्यक्त केल्या.

या प्रसंगी सागर भालेकर, युनूसभाई शेख, बाबासाहेब जाधव, राजेंद्र चव्हाण, श्रीराम चव्हाण, बापू भालसिंगे, बाबूभाई शेख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी आयुब शेख व त्यांच्या कुटुंबीयांना शुभेच्छा देत त्यांच्या पवित्र यात्रेसाठी सदिच्छा व्यक्त केल्या. सत्कार समारंभ आनंदी आणि धार्मिक वातावरणात पार पडला.

## गोवंश कत्तल व गोमांस विक्री प्रकरणातील

# तिघांना चार तालुक्यांतून हद्दपार

### सहा महिन्यांसाठी प्रवेशबंदी; पो. अधीक्षकांचे आदेश

**दिव्य सार्वमंथन**
**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी तालुक्यातील तिसगाव येथे गोवंश जनावरांना चारा-पाण्याविना क्रूरपणे डांबून ठेवणे, त्यांची कत्तल करून गोमांस विक्री केल्याच्या प्रकरणातील तिघांना सहा महिन्यांसाठी पाथर्डी, अहिल्यानगर, नेवासा आणि शेवगाव या चार तालुक्यांतून हद्दपार करण्याचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षकांनी दिले आहेत. हद्दपार करण्यात आलेल्यांमध्ये रेहान सलीम कुरेशी (वय २७), जव्वाद सलीम शेख (वय १८) आणि अमजद नुरमोहम्मद शेख (वय ५२, सर्व रा. रविवार पेठ, तिसगाव, ता. पाथर्डी) यांचा समावेश आहे.पाथर्डी पोलीस ठाण्यात या तिघांविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम तसेच भारतीय न्याय संहितेतील विविध कलमान्वये दोन गुन्हे दाखल आहेत. या आरोपींविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १२९ अन्वये वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही त्यांच्या वर्तनात सुधारणा न झाल्याने आणि गोवंश जनावरांची कत्तल व गोमांस विक्री सुरूच ठेवल्याचा ठपका ठेवत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम अन्वये हद्दपारीचा प्रस्ताव जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे सादर करण्यात आला होता.या प्रस्तावावर सुनावणी झाल्यानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी तिन्ही आरोपींना सहा महिन्यांसाठी पाथर्डी, अहिल्यानगर, नेवासा व शेवगाव तालुक्यांतून हद्दपार करण्याचे आदेश दिले.

## नेवासेतून ज्ञानेश्वरी पालखीचे भव्य प्रस्थान

# विठूरायांच्या जयघोषात दिंडी पंढरीकडे रवाना

### पहिल्याच अधिकृत सोहळ्याला दिव्यता; रिंगण, पुष्पवृष्टी आणि व्यसनमुक्तीचा संदेश ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू

**दिव्य सार्वमंथन**
**नेवासा । प्रतिनिधी**



संत ज्ञानेश्वर महाराजांची कर्मभूमी आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे रचनास्थान असलेल्या श्रीक्षेत्र नेवासा येथून ग्रंथराज ज्ञानेश्वरी पायी पालखी दिंडीचे बुधवारी (दि. ८ जुलै) दुपारी पंढरपूरकडे भक्तिमय वातावरणात भव्य प्रस्थान झाले. शासनाची अधिकृत मान्यता मिळाल्यानंतरचा हा पहिलाच पालखी सोहळा असल्याने यंदाचा सोहळा विशेष दिव्य आणि ऐतिहासिक ठरला. सुमारे तीस दिंड्यांसह हजारो वारकरी ‘‘ज्ञानोबा माऊली तुकाराम’’च्या अखंड जयघोषात सहभागी झाले होते.

पालखी सोहळ्याची सुरुवात ज्ञानेश्वर महाराज मंदिरातून झाली. माऊलींच्या पादुकांचे तसेच पैस खांबाचे पूजन हभप भास्करगिरीजी महाराज, उद्धवजी महाराज, ज्ञानेश्वर माऊली कदम, देविदास महाराज म्हस्के, रमेशानंदगिरीजी महाराज, ऋषिनाथजी महाराज, ज्ञानेश्वरजी महाराज यांच्या हस्ते मंत्रोच्चारात पार पडले.

यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे-पाटील, रत्नमालाताई लंघे-पाटील, देवस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, माजी आमदार नरेंद्र घुले-पाटील, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, शंकरराव लोखंडे, शिवसेनेचे युवा नेते प्रभाकरराव शिंदे, उदयनदादा गडाख-पाटील, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, डॉ. क्षितिज घुले, नंदकुमार पाटील, ॲड. संजय सुखदान आदी मान्यवरांच्या हस्ते पालखी रथातील पादुकांचे पूजन करण्यात आले.

पालखीचा रथ, मानाचे बैल व आश्व यांचेही विधिवत पूजन करण्यात आले. दिंडीच्या अग्रभागी भगव्या पताकेसह तुळशी कलश वाहणाऱ्या महिला, टाळ-मृदुंगाच्या गजरात चालणारे वारकरी आणि फुलांनी सजविलेल्या चांदीच्या रथात विराजमान माऊलींच्या पादुका असा दिमाखदार सोहळा पाहायला मिळाला. नेवासा शहराला प्रदक्षिणा घालत दिंडीने भक्तिभावाचे वातावरण निर्माण केले.

नंदकुमार खरात महाराज, उद्धव महाराज नेवासकर, अंकुश महाराज जगताप यांनी विविध ठिकाणी पालखीचे स्वागत केले. फटाक्यांची आतषबाजी, तोफांची सलामी, रांगोळ्या आणि पुष्पवृष्टीने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. नगरपंचायत चौकात स्व. राजेंद्र मापारी मित्र मंडळाच्या वतीने जेसीबीद्वारे पुष्पवृष्टी करण्यात आली, तर नगरसेवक स्वप्नील मापारी यांनी संतांचा सत्कार केला. महाराष्ट्र बँक चौकात मुथा कुटुंबाकडून फराळाचे वाटप करण्यात आले.

> ‘‘पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या संकल्पनेतून आणि चित्रकार भरत कुमार उदावंत, सत्यजित उदावंत यांच्या पुढाकारातून दिंडीत व्यसनमुक्तीचा प्रभावी संदेश देण्यात आला. आमदार विठ्ठलराव लंघे-पाटील, महाराज मंडळी व महिला मंडळांनीही फलक हातात घेऊन समाजप्रबोधनाचा संदेश दिला, ही या सोहळ्याची विशेष बाब ठरली.’’

नेवासा एसटी स्थानक परिसरात या पालखी सोहळ्यातील पहिला रिंगण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. अश्व रिंगण आणि झेंडा रिंगणात वारकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. ‘‘ज्ञानोबा माऊली तुकाराम’’च्या जयघोषात परिसर भक्तिमय झाला होता. नेवासा आगाराचे आगार व्यवस्थापक प्रशांत होले तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांनी पालखीचे पूजन केले. तसेच नेवासा प्रेस क्लब आणि पत्रकारांच्या वतीनेही पालखीचे स्वागत करून देविदास महाराज म्हस्के यांचा सत्कार करण्यात आला.

व्यसनमुक्तीची दिंडी. पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या संकल्पनेतून आणि चित्रकार भरत कुमार उदावंत, सत्यजित उदावंत यांच्या पुढाकारातून ही दिंडी काढण्यात आली. व्यसनमुक्तीचे संदेश देणारे फलक हातात घेऊन वारकऱ्यांनी समाजप्रबोधनाचा प्रभावी संदेश दिला. या उपक्रमात आमदार विठ्ठलराव लंघे-पाटील, पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, विविध महाराज मंडळी तसेच महिला मंडळांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

## सोनई परिसरात दमदार पावसाची हजेरी
## पेरणीला वेग, ऊस लागवडीच्या क्षेत्रवाढीची चिन्हे

**दिव्य सार्वमंथन**
**सोनई । प्रतिनिधी**

नेवासा तालुक्यातील सोनई व परिसरात गेल्या तीन दिवसांपासून झालेल्या दमदार तसेच रिमझिम पावसामुळे खरीप हंगामाला अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. भिज पावसामुळे जमिनीत आवश्यक ओलावा निर्माण झाल्याने शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व तयारीला वेग दिला असून बियाणे व खतांच्या खरेदीसाठी कृषी केंद्रांवर गर्दी वाढू लागली आहे.

सोनई परिसर हा ऊस उत्पादनासाठी जिल्ह्यातील महत्त्वाचा पट्टा म्हणून ओळखला जातो. गेल्या काही दिवसांत धरणाच्या पाणलोट क्षेत्रातही चांगला पाऊस झाल्याने मुळा धरणात पाण्याची आवक सुरू झाली आहे. त्यामुळे आगामी हंगामात सिंचनाची उपलब्धता वाढण्याची शक्यता व्यक्त होत असून ऊस लागवडीच्या क्षेत्रात वाढ होईल, असा अंदाज कृषी क्षेत्रातून व्यक्त केला जात आहे.

यंदा पावसाच्या प्रतीक्षेत असलेले शेतकरी पहिल्या समाधानकारक भिज पावसानंतर शेतात उतरले आहेत. ट्रॅक्टरद्वारे मशागत, वखरणी, पेरणीसाठी जमिनीची तयारी आणि बियाण्यांची खरेदी या कामांना वेग आला आहे. पाऊस काही दिवस उघडीप देत राहिल्यास खरीप पिकांच्या पेरण्या मोठ्या प्रमाणात पूर्ण होतील, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.: पावसामुळे शेतीला दिलासा, मात्र सातत्यही तितकेच महत्त्वाचे यंदाच्या खरीप हंगामासाठी वेळेवर झालेला भिज पाऊस शेतकऱ्यांसाठी आशादायी ठरला आहे. जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाल्यामुळे पेरणीसाठी अनुकूल परिस्थिती तयार झाली आहे. दुसरीकडे मुळा धरणातील पाणीसाठा वाढण्याची चिन्हे दिसत असल्याने ऊस उत्पादकांचा आत्मविश्वासही वाढला आहे.

मात्र, केवळ सुरुवातीचा पाऊस पुरेसा ठरणार नाही. पावसाचे सातत्य कायम राहणे आणि योग्य अंतराने पाऊस होत राहणे आवश्यक आहे. तसे झाल्यास खरीप पिकांचे उत्पादन वाढण्याबरोबरच ऊस लागवडीचे क्षेत्रही वाढेल आणि त्याचा सकारात्मक परिणाम स्थानिक अर्थव्यवस्था तसेच साखर उद्योगावर होण्याची शक्यता आहे.

## गरिबी संघर्षाची कहाणी सांगणाऱ्या ‘भावड्या’ चित्रपटाची शूटिंग

### चनेगाव, पाथरे बुद्रुक येथे मराठी चित्रपटाच्या शूटिंगला प्रारंभ

**दिव्य सार्वमंथन**
**राहाता । प्रतिनिधी**

गरिबी, संघर्ष, समाजाचे टोमणे आणि जिद्दीच्या बळावर स्वत:ची ओळख निर्माण करणाऱ्या एका गरीब मुलाची हृदयस्पर्शी कथा मांडणाऱ्या ‘भावड्या’ या मराठी चित्रपटाचे शुभमुहूर्त आणि शूटिंगचा प्रारंभ पाथरे, चनेगाव येथे उत्साहात संपन्न झाला.

‘भावड्या’ हा चित्रपट एका गरीब मुलाच्या आयुष्याचा संघर्ष मांडणारा असून, गावातील लोकांच्या उपहासाचा आणि हाल-अपेष्टांचा सामना करत तो स्वत:ची वाट कशी निर्माण करतो, याची प्रेरणादायी कहाणी या चित्रपटातून उलगडण्यात येणार आहे. गरिबी, सामाजिक विषमता आणि जिद्दीची ताकद यांचे वास्तवदर्शी चित्रण या चित्रपटात करण्यात आले आहे.

चित्रपटाचे निर्माते ज्ञानदेव शिंदे व प्रमोद पंडीत यांनी सांगितले की, ‘भावड्या’ ही केवळ काल्पनिक कथा नसून समाजातील अनेक गरीब कुटुंबांच्या वास्तव आयुष्याचे प्रतिबिंब आहे. हा चित्रपट प्रेक्षकांच्या मनाला भिडणारा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या मराठी चित्रपटाची लोकेशन चनेगाव, पाथरे बुद्रुक या परिसरात सुरू आहे, या चित्रपटात सिद्धी गाडेकर, अबोली बंगाळ, नीता कांबळे, तृप्ती निर्मळ, प्रसन्न जोशी, ज्ञानेश्वर थोटे, ज्ञानदेव शिंदे, अनिल गंगावणे, प्रथमेश केदार, रागिणी चिखलकर, प्रकाश डुकरे आणि भीमा अलोट हे कलाकार भूमिका साकारणार आहेत. चित्रपटाचे छायांकन गणेश तुरकणे, दिग्दर्शक विशाल बर्डे ,करीत आहेत. या चित्रपटाचे मुख्य भूमिकेत अभिनेता व दिग्दर्शक प्रमोद पंडीत म्हणाले की, हा सिनेमा प्रेक्षकांना हसवेल, रडवेल आणि विचार करायला भाग पाडेल. भावना, नाट्य, संघर्ष आणि सिनेमॅटिक



थरार यांचा सुंदर संगम या चित्रपटात पाहायला मिळणार आहे.

चित्रपटातील कथानक, वास्तववादी मांडणी आणि सामाजिक संदेश यामुळे ‘भावड्या’ हा चित्रपट मराठी सिनेसृष्टीत नवा अध्याय लिहील, असा विश्वास संपूर्ण चित्रपटाच्या टीमने व्यक्त केला असून लवकरच नियमित शूटिंगला सुरुवात होणार आहे.

**पाहिजेत**
**सार्वमंथन न्युज महाराष्ट्र चॅनेलसाठी**
अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यासह प्रत्येक तालुक्यात
**न्युज रिपोर्टर व कॅमेरामन**
जागा भरणे आहे. आकर्षक पगारासह इतर सुविधा दिल्या जातील. इच्छुकांनी खालील क्रमांकावर संपर्क करावा.
**दै. सार्व मंथन कार्यालय,**
तनपुरेवाडी रोड, अनमोल गणपती मंदिरासमोर,
राहुरी, जि. अहिल्यानगर. मो. 9822544072



## साकुरी येथे खरीप पीक विमा २०२६ योजनेचा शुभारंभ

साकुरी । साकुरी येथे खरीप हंगाम २०२६ साठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा शुभारंभ उत्साहात करण्यात आला. यावेळी परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पीक विमा योजनेची सविस्तर माहिती जाणून घेतली तसेच ऑनलाईन अर्ज प्रक्रियेलाही सुरुवात करण्यात आली. अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, वादळी वारे तसेच कीड-रोग यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे शेती व्यवसाय अधिक जोखमीचा बनला आहे.

# आ. प्राजक्त तनपुरेंमुळे तांदुळवाडी ते आरडगाव बसला हिरवा कंदील

**दिव्य सार्वमंथन**
**राहुरी । ता. प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यातील अति महत्त्वाचा पूर्व भाग म्हणून ओळख असलेल्या तांदुळवाडी–कोंढवड–शिलेगाव–केंदळ–आरडगाव या महत्त्वाच्या मार्गावर लवकरच एसटी बस धावणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत.

विधान परिषद सदस्य आमदार प्राजक्त तनपुरे यांच्या सातत्यपूर्ण आणि आक्रमक पाठपुराव्याला अखेर यश आले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून या भागातील नागरिक, विशेषतः विद्यार्थी, शेतकरी आणि महिलांना वाहतुकीच्या मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. खासगी वाहनांवर अवलंबून राहण्याची वेळ येत असल्याने आर्थिक व सुरक्षिततेच्या समस्या निर्माण होत होत्या. या पार्श्वभूमीवर आ.तनपुरे यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे वारंवार पाठपुरावा करत हा मुद्दा लावून धरला होता.

राहुरी रेल्वे स्टेशनपासून तांदुळवाडी, कोंढवड, शिलेगाव, केंदळ मार्गे आरडगावपर्यंत बससेवा सुरू करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी सातत्याने



संपर्क साधत त्यांनी प्रशासनाला हालचाल करायला भाग पाडले. अखेर परिवहन विभागाने या मार्गाची प्रत्यक्ष पाहणी करत मंगळवारी बसची प्रायोगिक चाचणी घेतली. ही चाचणी समाधानकारक ठरल्याची माहिती मिळत असून, नियमित बससेवा सुरू होण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

या निर्णयामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, शेतकऱ्यांना बाजारपेठेसाठी आणि सर्वसामान्यांना दैनंदिन प्रवासासाठी मोठा आधार मिळणार आहे. स्वस्त, सुरक्षित आणि नियमित सार्वजनिक वाहतूक उपलब्ध होणार असल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, ग्रामस्थांनी तनपुरे यांच्या प्रयत्नांचे जोरदार स्वागत करत ''वर्षानुवर्षांची मागणी पूर्ण करणारे नेतृत्व'' अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

## मंथन फटकारे

**अनुसंगम तथा बाळासाहेब शिंदे**
**मो. ९५०३९५९९५७**

रमाई आवास योजनेत कोट्यावधिंचा घोटाळा–अंबादास दानवे

**– मागासवर्गीय विद्यार्थी स्कॉलरशिप, अनेक योजनांचा निधी परस्पर वापरतात? त्यावर आवाज कोण उठविणार?**

लाडकी बहिण योजनेची रक्कम वाढवावी–नीलम गोऱ्हे

**– सध्या योजना राबविण्यासाठी दुसऱ्या खात्याचा निधी वळवला जातोय, त्याच काय? विद्यार्थ्यांच्या स्कॉलरशिप बंद व्हायला लागल्यात?**

शरद पवार एनडीएत असते तर राष्ट्रपती झाले असते–आठवले

**– त्यांना नाही जमले ते! जनता तुम्हालाच राष्ट्रपती पाहण्यास उत्सुक आहे? जमेल का?**

निवड समितीवर विखेंचे वर्चस्व–वृत्त

**– अहिल्यानगर जिल्ह्यात विरोधक नावालाच राहिलेत? संगमनेरचा आवाज तर एकदम बंद झाल्यासारखा वाटतोय?**

माळशिरस मध्ये मातंग महिलेवर गोळीबार,दिपक केदार मैदानात–वृत्त

**– कोठेही मागासवर्गीय लोकांवर अन्याय झाला कि केदार निळा झेंडा घेऊन हजर! वर्गीकरण मागणारे नेते कोठे? समाजासाठी जगणे हे येऱ्या–गबाळ्याचे काम नाही!**

उद्धव ठाकरे महाराष्ट्राचा दौरा करणार–वृत्त

**– तुम्ही दौरा करत महाराष्ट्रात फिरता आणि तिकडे मुंबईचे शिलेदार हळूच शिंदेंना भेटतात?**

## अज्ञात चोरांनी दुचाकी लांबविली

**दिव्य सार्वमंथन**
**शिंगणापूर । प्रतिनिधी**

नेवासा तालुक्यातील वडाळा बहिरोबा येथील साप्ताहिक बाजारात उभी केलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना ३० जून रोजी घडली असून, या प्रकरणी शनि शिंगणापूर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी किरण दत्तू घोरपडे (वय ३५, व्यवसाय – नोकरी, जलसंपदा विभाग, रा. वडाळा बहिरोबा, ता. नेवासा) हे ३० जून रोजी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास वडाळा बहिरोबा येथील बाजारासाठी गेले होते. त्यांनी आपली काळ्या–जांभळ्या रंगाची हिरो स्प्लेंडर प्लस (एमएच–१७ सीई–२८०२) ही मोटारसायकल बाजार परिसरात उभी केली होती.

बाजार आटोपल्यानंतर परत आल्यानंतर मोटारसायकल जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. परिसरात शोध घेऊनही वाहनाचा कोणताही मागमूस लागला नाही. चोरीस गेलेल्या मोटारसायकलीची किंमत सुमारे २५ हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या घटनेनंतर फिर्यादी यांनी शनि शिंगणापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणाचा पुढील तपास शनि शिंगणापूर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी करीत आहे.

## २२०० किमी पदयात्रेचा अद्भुत संकल्प पूर्ण

### उद्योजक सतीश तनपुरे यांचा राहुरीत नागरी सत्कार

**दिव्य सार्वमंथन**
**राहुरी । प्रतिनिधी**

दृढ श्रद्धा, सेवाभाव आणि ध्येयपूर्तीची जिद्द असेल, तर कोणतेही अंतर मोठे नसते याचा जिवंत प्रत्यय सतीश तनपुरे यांच्या कार्यातून आला. राहुरी ते माता वैष्णोदेवी (कटरा) अशी तब्बल २२०० किलोमीटरची पदयात्रा अवघ्या ७५ दिवसांत पूर्ण करत त्यांनी अशक्य वाटणारे स्वप्न साकार केले. त्यांच्या या प्रेरणादायी कार्याचा प्रत्येकाने आदर्श घ्यावा, असे प्रतिपादन भाजपा प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.

या ऐतिहासिक पदयात्रेच्या यशस्वी पूर्तीनंतर राहुरीत सतीश तनपुरे यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. शहरातून भव्य



मिरवणूक काढण्यात आली असून त्यानंतर झालेल्या सत्कार समारंभात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी तनपुरे यांच्या कार्याचा गौरव केला.

राहुरी येथील उद्योजक व माता वैष्णोदेवीचे निस्सीम भक्त सतीशकाका साहेबराव तनपुरे यांनी ही पदयात्रा आपल्या सहकाऱ्यांसह पूर्ण केली. बाळासाहेब कुऱ्हाट, सुभाष चोपडे, गोरख कटारे यांच्यासह एकूण पाच जणांनी या यात्रेत सहभाग घेतला होता. या सर्व पदयात्रींचाही यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कटरा येथे सुखरूप पोहोचून माता वैष्णोदेवीच्या चरणी संकल्पपूर्ती केल्यानंतर राहुरीत त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. या प्रसंगी हभप उद्धव महाराज मंडलिक यांनी मनोगत व्यक्त करत तनपुरे यांच्या कार्याचे कौतुक केले.

कार्यक्रमास संत कवी महिपती महाराज देवस्थान ट्रस्टचे हभप अर्जुन महाराज तनपुरे, राहुरी तालुका विकास मंडळाचे अध्यक्ष रावसाहेब तनपुरे, सुभाष फराटे–देशमुख, शितलकुमार फराटे–देशमुख, संदीप फराटे–देशमुख, नितीन तनपुरे, शुभम तनपुरे, हर्षल तनपुरे, अक्षय तनपुरे, सुरज तनपुरे, रमेश नालकर, शनेश्वर देवस्थान ट्रस्टचे विकास बानकर, किशोर बानकर, कैलास तनपुरे, विकास तनपुरे, जितेंद्र तावरे, नगरसेवक सोन्याबापू जगधने यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, भाविक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मातादीच्या जयघोषात पार पडलेला हा सोहळा श्रद्धा, भक्ती आणि प्रेरणेचा अविस्मरणीय संगम ठरला.

## श्री शनैश्वर देवस्थानच्या 'महंत उदासी महाराज' आषाढी वारी पायी दिंडीचे १४ जुलैला पंढरपूरकडे

### १३ दिवसांचा प्रवास; २६ जुलै रोजी पंढरपूरात पोहोचणार

**दिव्य सार्वमंथन**
**सोनई । प्रतिनिधी**

श्री शनैश्वर देवस्थान, श्रीक्षेत्र शिंगणापूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महंत उदासी महाराज आषाढी वारी पायी दिंडी सोहळ्याचे यंदाचे ३४वे वर्ष असून, आषाढ कृष्ण अमावास्या, मंगळवार दि. १४ जुलै २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता श्रीक्षेत्र शिंगणापूर येथून पंढरपूरकडे दिंडीचे प्रस्थान होणार आहे. तब्बल १३ दिवसांचा पायी प्रवास करून दिंडी दि.२६ जुलै रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे पोहोचणार आहे.

दिंडीमध्ये सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांसाठी संपूर्ण प्रवासाचे नियोजन देवस्थानच्या वतीने करण्यात आले असून वारकऱ्यांनी दिंडीत येण्यासाठी नावनोंदणी करून दिंडी पास घेणे आवश्यक असून याशिवाय दिंडीत प्रवेश मिळणार नाही. दिंडीत दररोज पहाटे काकडा आरती, हरिपाठ, भजन, प्रवचन, दिंडी मार्गक्रमण, संध्याकाळी हरिकीर्तन व रात्री कीर्तन असे नियमित धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. तसेच दि. २५ जुलै रोजी पहाटे ५ वाजता पंढरपूर दिंडी प्रदक्षिणा आयोजित करण्यात आली आहे.

दिंडीच्या मार्गावर विविध गावांमध्ये सकाळचा नाश्ता, दुपारचे भोजन तसेच रात्री मुक्कामाची व्यवस्था विविध भाविक, संस्था व दानशूर व्यक्तींनी केली आहे. शिंगणापूर, अहिल्यानगर, कर्जत,करमाळा, जेऊर, पंढरपूर आदी मार्गावरील ठिकाणी वारकऱ्यांचे स्वागत व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

देवस्थान प्रशासनाने दिंडीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांसाठी नियमावलीही जाहीर केली आहे. नोंदणी केलेल्या वारकऱ्यांनाच दिंडीत सहभागी होता येणार असून, सर्वांनी शिस्त, स्वच्छता व दिंडीची परंपरा जपत आयोजकांच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दिंडीदरम्यान व्यसनमुक्ती, साधेपणा, सामूहिक शिस्त आणि धार्मिक वातावरण कायम ठेवण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

या दिंडी सोहळ्याचे आयोजन श्री शनैश्वर देवस्थानचे प्रशासक डॉ. प्रविण गेडाम,कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे व सहाय्यक अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. दिंडीच्या यशस्वी आयोजनासाठी देवस्थान कर्मचारी, वारकरी, भजनी मंडळे, महिला भजनी मंडळे तसेच विविध सामाजिक व धार्मिक संस्थांचे सहकार्य लाभत आहे.

आषाढी वारीच्या निमित्ताने शनिशिंगणापूर दिंडीत हजारो वारकरी श्री विठ्ठल–रुक्मिणीच्या दर्शनासाठी पायी प्रवास करणार असून, भक्ती, नामस्मरण आणि संत परंपरेचा वारसा जपणारा हा दिंडी सोहळा भाविकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.

> श्री शनेश्वर देवस्थान तर्फे पंढरपूर येथे वार्षिक दिंडीची परंपरा यंदाही तितक्याच भक्तीभावाने सुरु राहणार आहे.शनिशिंगणापूर देवस्थानची दिंडी पंढरपूरकडे १४ जुलै रोजी प्रस्थान करेल.सर्व वारकऱ्यांचा प्रवास सुरक्षित, सुखकर आणि आरोग्यदायी व्हावा यासाठी देवस्थान प्रशासना तर्फे नियोजन व आवश्यक सुविधा उपलब्ध करणेबाबत कार्यवाही सुरू आहे. तसेच वारीत येणाऱ्या सर्व वारकऱ्यांनी लवकरात लवकर देवस्थान कडे नाव नोंदणी करून दिंडी पास घ्यावेत.
>
> - अतुल चोरमारे
> कार्यकारी अधिकारी, शनीशिंगणापूर

## वारकऱ्यांच्या सेवेत देवळाली प्रवरा
# नाभिक समाजाची मोफत दाढी सेवा

### भजनी मंडळाकडून चहा–दूध वाटप, डॉक्टरांकडून वैद्यकीय सेवा

**दिव्य सार्वमंथन**
**दे. प्रवरा । प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातील श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलेल्या श्री संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्याचे गुरुवारी देवळाली प्रवरा येथे उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात आगमन झाले. पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या हजारो वारकऱ्यांच्या सेवेसाठी देवळाली प्रवरा येथील विविध सामाजिक संस्था, संघटना आणि सेवाभावी नागरिकांनी पुढाकार घेत विविध मोफत सेवा उपलब्ध करून दिल्या.



यामध्ये देवळाली प्रवरा नाभिक समाज बांधवांच्या वतीने वारकऱ्यांसाठी मोफत दाढी सेवेचे आयोजन करण्यात आले. दिवसभर अनेक वारकऱ्यांनी या सेवेचा लाभ घेतला. पायी वारी करताना वैयक्तिक स्वच्छतेची गरज लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला असून वारकऱ्यांनी नाभिक समाजाच्या या सेवाभावी कार्याचे मनापासून कौतुक केले.

याचबरोबर स्थानिक भजनी मंडळाच्या वतीने वारकऱ्यांना मोफत चहा व दूध वाटप करण्यात आले. सकाळपासूनच वारकऱ्यांच्या स्वागतासाठी स्वयंसेवक कार्यरत होते. थकलेल्या वारकऱ्यांना गरमागरम चहा व दूध देऊन त्यांचा प्रवास अधिक सुखकर करण्याचा प्रयत्न करण्यात आला. वारकऱ्यांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत आयोजकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. तर चर्मकार समाज बांधवांनी चप्पल शिवण्याची सेवा दिली.

वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी डॉक्टरांच्या पथकाने मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली. वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, आवश्यक औषधांचे मोफत वितरण तसेच प्राथमिक उपचार करण्यात आले. पायी चालण्यामुळे होणारा थकवा, पायांचे त्रास, ताप, सर्दी यांसारख्या किरकोळ तक्रारींवर तातडीने उपचार करण्यात आले.

श्री संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्याच्या निमित्ताने देवळाली प्रवरा परिसर संपूर्णपणे भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाला होता. टाळ–मृदंगाच्या गजरात, हरिनामाच्या अखंड जयघोषात आणि ''ज्ञानोबा–तुकाराम''च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. पालखीचे दर्शन घेण्यासाठी तसेच वारकऱ्यांची सेवा करण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

''वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा'' या भावनेतून राबविण्यात आलेल्या या विविध सेवाभावी उपक्रमांमुळे देवळाली प्रवरा येथील सामाजिक बांधिलकी आणि सेवाभावाचे दर्शन घडले. स्थानिक नागरिक, स्वयंसेवक, सामाजिक संस्था आणि विविध मंडळांनी एकत्र येऊन वारकऱ्यांसाठी केलेल्या या व्यवस्थेचे वारकरी व भाविकांकडून विशेष कौतुक करण्यात आले.

## उपनगराध्यक्षांसह अकरा नगरसेवकांचे पोलिसांना निवेदन

**दिव्य सार्वमंथन**
**नेवासा । प्रतिनिधी**

नेवासा नगरपंचायतीतील लोकप्रतिनिधी आणि प्रशासनातील वाद अधिक विकोपाला गेला असून, मुख्याधिकारी निखिल फराटे यांच्याविरोधात केलेल्या तक्रारींनंतर आपल्याविरुद्ध सूडबुद्धीने खोटे गुन्हे दाखल होण्याची भीती असल्याचा दावा उपनगराध्यक्षांसह अकरा नगरसेवकांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना निवेदन सादर करून संरक्षणात्मक भूमिका मांडली आहे.



नगरसेवकांनी दिलेल्या निवेदनानुसार, मुख्याधिकारी यांच्या कार्यकाळातील कथित आर्थिक अनियमितता, अधिकारांचा गैरवापर आणि शासन निर्णयांच्या उल्लंघना बाबत जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त तसेच नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित सक्षम प्राधिकरणांकडून चौकशी सुरू असून, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून खुलासा मागविण्यात आल्याची तसेच काही प्रकरणांबाबत चौकशीसंदर्भातील पत्रे प्राप्त झाल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे.

या निवेदनावर उपनगराध्यक्ष शालिनी संजय सुखदान, गटनेते जितेंद्र कुऱ्हे, नगरसेविका जयश्री चंद्रकांत शिंदे, शहिदाबी इलायत खान पठाण, सोनल राहुल चव्हाण, नसरीन मुक्तार शेख, शोभा प्रताप व्यवहारे, प्रतिभा जालिंदर गवळी, नगरसेवक संभाजी धोत्रे, स्वप्नील मापारी तसेच स्वीकृत नगरसेवक राजेंद्र काळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दैनिक दिव्य सार्वमंथन — नवी दिशा, नवी आशा

**दैनिक दिव्य सार्वमंथन** हे वृत्तपत्र मालक **प्रकाशक सौ. सपना अनिल कोळसे** यांनी मुद्रक **श्री अनिल गंगाधर कोळसे** यांच्या **स्वराज प्रेस आणि प्रिंटिंग, गट नं. ५९३, कोळसे निवास, कोळसे दुबिचा मळा, व्यंकोबा मंदिर परिसर, ता. राहुरी, अहिल्यानगर, महाराष्ट्र – ४१३७०५** येथे छापून सर्वे. नं ५९३, दुबिचा मळा, व्यंकोबा मंदिर परिसर, ता. राहुरी, अहिल्यानगर, महाराष्ट्र ४१३७०५ येथे प्रकाशित केला. संपादक – **श्री अनिल गंगाधर कोळसे,** (सर्व न्यायालयीन वादविवाद राहुरी न्याय कक्षे अंतर्गत)
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही) पोस्टल परवाना : SRP/146/2026-2028
**The Daily Divya Sarvmanthan** Is Published By The Owner And Publisher, Sapna Anil Kolse, printed It At, printer Anil Gangadhar Kolses, Swaraj Press And Printing. S. No. 593, Dubicha Mala, Vynkoba Mandir Area, Rahuri, Ahilyanagar, Maharashtra - 413705 And Published At S. No. 593, Dubicha Mala, Vynkoba Mandir Area, Rahuri, Ahilyanagar, Maharashtra - 413705. editor-anil Gangadhar Kolse,
**e-Mail-Sarvmanthan16@gmail.com, MHMAR/26/A3154.** Postal Licence Number : SRP/146/2026-2028